# प्रेसनोट

दि.०३.०५.२०१९

**शिर्षक – तक्रारदार यांचे नाव सुशिक्षीत बेरोजगार अभियंता(कॉन्ट्रक्टर सुपअरवाईजर) म्हणून नोंद करून, सदरच्या प्रकरणाची फाईल तयार करून त्यावर वरीष्ठांची सही घेण्यासाठी २०००/- लाच स्विकारणाऱ्या श्रीमती राठोड,बांधकाम विभाग, जि.प.सोलापूर यांना रंगेहात पकडले.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट. |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर, गुरनं /२०१९ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | श्रीमती निर्मला पुंडलिक राठोड, वय ४७ वर्षे, वरीष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग-१,जिल्हा परीषद, सोलापूर, रा. कंदलगाव, ता.दक्षीण सोलापूर, जिल्हा सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २५००/- रूपये मागणी करून तडजोडीअंती २०००/- रूपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २०००/- रूपये. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांनी बांधकाम विभाग, जिल्हा परीषद सोलापूर यांचेकडे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता(कॉन्ट्रक्टर सुपअरवाईजर) म्हणून नोंद करून प्रमाणपत्र मिळण्यासाठी रीतसर अर्ज करून कागदपत्रे सादर केली होती. त्यावरून सदरची नोंदणी झाली अगर कसे याबाबत बांधकाम विभागातील श्रीमती राठोड यांचेकडे विचारपूस केली असता श्रीमती राठोड यांनी २५००/- रूपये लाचेची मागणी केली म्हणून तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर कडे तक्रार नोंदवली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची आज दि.०३.०५.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडून पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये तक्रारदार यांच्याकडे श्रीमती राठोड यांनी अगोदर २५००/- रूपये लाचेची मागणी केली परंतू तक्रारदार यांनी ती लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली असता तडजोडीअंती २०००/- रूपये लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर श्रीमती राठोड यांच्या विरूध्द बांधकाम विभाग,जिल्हा परीषद सोलापूर येथे लावण्यात आलेल्या लाचेच्या सापळ्यामध्ये तक्रारदार यांचेकडून श्रीमती राठोड यांनी २०००/- रूपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरबाबत श्रीमती निर्मला पुडलिक राठोड, वय ४७ वर्षे, वरीष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग-१,जिल्हा परीषद, सोलापूर, रा. कंदलगाव, ता.दक्षीण सोलापूर, जिल्हा सोलापूर यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार ॲप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसॲप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

(जगदीश भोपळे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

Scanned by CamScanner